# महिला व बालविकास आयुक्तालय

२८,राणीचा बाग ,जुन्या सर्किट हाउस शेजारी ,पुणे ०१.

## प्रसिध्दीपत्रक

आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अधिनस्त आस्थापनेवरील गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड या संवर्गातील **(१)** संरक्षण अधिकारी, गट- ब (अराजपत्रित)- २ पदे **(२)** परिविक्षा अधिकारी,गट-क ७२ पदे **(३ )** लघुलेखक (उच्चश्रेणी), गट-क १ पद **(४)** लघुलेखक (निम्नश्रेणी), गट-क २ पदे **(५)** वरिष्ठ लिपीक/सांख्यिकी सहायक, गट-क ५६ पदे **(६)** संरक्षण अधिकारी (कनिष्ठ), गट-क ५७ पदे **(७)** वरिष्ठ काळजी वाहक, गट-ड ४ पदे **(८)** कनिष्ठ काळजी वाहक, गट-ड ३६ पदे **(९)** स्वयंपाकी, गट-ड ६ पदे भूतपुर्व दुय्यम सेवा मंडळाच्या कक्षेतील निम्न नमुद सरळसेवा कोटयातील रिक्त असलेली पदे भरण्याकरीता पात्र उमेदवारांकडुन दि.१४-१०-२०२४ ते दि.१०-११-२०२४ ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आलेले होते. सदर भरती प्रक्रियेच्या संगणक आधारीत **वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची ऑनलाईन परिक्षा दि.१०-२-२०२५ ते दि.१३-२-२०२५ व दि.१७-२-२०२५ या कालावधीत** विविध सत्रामध्ये आयोजित करण्यात आलेल्या होत्या.

१. **उक्त नमुद ऑनलाईन परीक्षेचा पदनिहाय/संवर्गनिहाय निकाल** https://www. Wcd commpune.com या **संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला आहे.**

२. उक्त नमुद भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने **१.**परिविक्षा अधिकारी,गट-क **२.**वरिष्ठ लिपीक/सांख्यिकी सहायक,गट-क **३.**संरक्षण अधिकारी (कनिष्ठ), गट-क या संवर्गाकरी**ता एकापेक्षा अधिक सत्रामध्ये ऑनलाईन परीक्षा आयोजीत करण्यात आलेल्या असल्याने** सदर संवर्गांचा/पदांचा निकाल सामान्यीकरणासह (Normalization) प्रसिध्द करण्यात आलेला आहे. उर्वरीत संवर्गाच्या/पदांकरीता ऑनलाईन परीक्षा केवळ एका सत्रामध्ये आयोजीत करण्यात आलेला असल्याने सदर संवर्गाचा निकाल सामान्यीकरणासह (Normalization) प्रसिध्द करण्यात आलेला नाही, याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**३. उक्त नमुद भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने व्यावसायिक परीक्षा,कागदपत्र पडताळणी, गुणवत्ता यादी व इतर प्रक्रियेबाबत** अदयावत सूचना/प्रसिध्दीपत्रक याबाबतची माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी महिला व बाल विकास विभागाच्या https://www.wcdcommpune.com संकेत स्थळाला वेळोवेळी भेट देण्याबाबत सर्व उमेदवारांना याव्दारे आवाहन करण्यात येत आहे.

दिनांक :- २/६/२०२५
स्थळ :- पुणे

**(नयना अर्जुन गुंडे)** भा.प्र.से
**आयुक्त**
**महिला बाल विकास**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**